पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक -           दिनांक - ३०/१२/२०२३**

पीसीबी गुन्हे शाखा,पुणे शहर

**हडपसर पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या, अट्टल गुन्हेगारावर**
**मा. पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेची कारवाई**

पुणे पोलीस आयुक्तालयातील हडपसर पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारा अट्टल गुन्हेगार नामे-**अभिषेक उर्फ नयन हरिदास भोसले,वय-१९ वर्षे,रा.शेख जिवनबापू चाळ जवळ,स्मशानभूमी रोड, शेवाळवाडी,पुणे,ता.हवेली,जि.पुणे** हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. त्याने साथीदारांसह हडपसर पोलीस स्टेशनच्या हद्दीत चाकु, लोखंडी कोयता या सारख्या जीवघेण्या घातक हत्यारांसह दुखापतीसह जबरी चोरी,जबरी चोरी,खंडणी,दुखापत,बेकायदा हत्यार बाळगणे यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत. **मागील ०५ वर्षामध्ये त्याचेविरूध्द ०५ गंभीर गुन्हे दाखल आहेत.** त्याच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती. तसेच त्याच्यापासून जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करणेस धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, यांनी नमूद इसमाचे विरुध्द एम.पी.डी.ए.कायद्यान्वये नागपुर मध्यवर्ती कारागृह,नागपुर येथे १ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.** नमूद इसमास स्थानबध्द करण्यामध्ये श्री.रविंद्र शेळके ,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,हडपसर पोलीस स्टेशन,पुणे व श्री.चंद्रकांत बेदरे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर यांचे आधिपत्याखाली पोलीस आधिकारी व पोलीस अंमलदार यांनी सदरची कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा. पोलीस आयुक्त यांनी चालु वर्षामध्ये दहशत निर्माण करणा-या व सक्रिय अट्टल गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. कायद्यान्वये स्थानबध्दतेच्या ७६ कारवाया केल्या आहेत**. यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.